# जिल्हा परिषद अमरावती

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय

कॅम्प रोड, अमरावती ४४४ ६०१

दूरध्वनी क्रमांक - २६६२९२६ ई मेल - ceozp.amravati@maharashtra.gov.in

वेबसाईट - www.zpamravati.gov.in

58

क्रमांक जिप/मुकाअ/ /स्वीस/2017

दिनांक - 9 मे, 2017

प्रति,

श्री. जे.एन.आभाळे,

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)

जिल्हा परिषद अमरावती

**विषय - प्रलंबित कामाबाबत....**

ग्रामपंचायत विभागाशी संबंधित आपणास व आपले अधिनस्त अधिकारी यांना खालील प्रमाणे कामे करण्याबाबत सूचित करण्यात आलेले आहे. परंतु अद्यापपर्यंत आपले विभागाकडून या सदंर्भात कार्यवाही झालेली निदर्शनास येत नाही.

1. ग्रामपंचायत कठोरा ता. अमरावती येथे घनकचरा व्यवस्थापनासाठी ग्रामपंचायतीला ई क्लॉस जमीनीची आवश्यकता आहे. याबाबत संबंधित ग्रामपंचायतीकडून पाठपुरावा होत आहे. याबाबत नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही पूर्ण करुन संबंधित ग्रामपंचायत तसेच तहसिलदार, अमरावती यांना कळविण्यात यावे.
2. ग्रामपंचायत देवमाळी ता. अचलपूर येथील ग्रामसेवकाची व इतर प्रकरणांची चौकशी करुन अहवाल सादर करणेबाबत कळविण्यात आले होते. परंतु अद्यापपर्यंत अहवाल सादर करण्यात आलेला नाही.
3. ग्रामपंचायत मुसळखेडा ता. वरुड येथील यशवंत देवस्थान हस्तांतराबाबत चौकशी करुन अहवाल सादर करणेबाबत कळविण्यात आले आहे. याबाबत मा.आ. अनिल बोंडे, विधानसभा सदस्य यांचेकडून सतत पाठपुरावा करण्यात येत आहे. सदर प्रकरण तातडीने निकाली काढावे.
4. ग्रामपंचायत पहूर ता. नांदगांव खंडेश्वर येथील श्री. अमोल ठाकरे यांचे तक्रारीचे अनुषंगाने केलेली कार्यवाही तसेच तक्रारकर्त्यास आवश्यक माहिती तसेच अंतिम उत्तर देण्यात आलेले नाही. याप्रकरणी संबंधित विस्तार अधिकारी, ग्रामसेवक यांची तक्रारकर्त्यासमवेत मु.का.अ.कडे सुनावणी ठेवावी.

6. ग्रामपंचायत धानोरा फसी ता. नादगांव खंडेश्वर येथील चौकशी प्रकरणात ग.वि.अ. नांदगांव खंडेश्वर यांचेकडून अहवाल प्राप्त झालेला आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही तातडीने करावी व तसा अहवाल या आठवडयात सादर करावा.

7. सरपंच इसापूर ता. अचलपूर यांचे विरुध्द प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने नियमानुसार कार्यवाही करुन अंतिम अहवाल सादर करावा.

वरील मुद्यांबाबतचे अनुपालन दिनांक 15 मे, 2017 पूर्वी करुन मला लेखी अवगत करावे.

**(डॉ. किरण कुलकर्णी, भाप्रसे)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अमरावती**